श्री रविकरिण भास्कर भोजणे,
प्राथमिक शिक्षक, जि.प.सेवेतुन
सेवा निलंबित केलेले यांना जि.प.
सेवेत पुन:स्थापित करणेबाबत

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जावक क्रमांक. कार्या2/खाचौद/ ३७५ /२०२१
अहमदनगर, दिनांक - ०६/०९ /२०२१

संदर्भ -
1) या कार्यालयाकडील पदावरुन तात्पुरत्या रित्या दूर केलेला आदेश क्रमांक कार्या२/खाचौद/१२/२०१९, दिनांक ०३/०१/२०१९
2) या कार्यालयाकडील १ ते ४ दोषारोप आदेश क्रमांक कार्या२/खाचौद/३७७/२०१९, दिनांक २१/०५/२०१९
3) सहाय्यक आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्रमांक विशा४/खा.चौ./सी.आर./१००/२०१९, दिनांक १३/०४/२०२०
४) मा.न्यायालय रिट याचिका क्रमांक ७५३/२०१९ चा अंतिम निकाल दिनांक ०३/०२/२०२१
५) गट शिक्षणाधिकारी यांचेकडील पत्र क्रमांक वशि/आस्था/डीई/१७१/२०२१ दिनांक २२/०६/२०२१ प्राप्त दिनांक २४/०६/२०२१
६) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४
७) मा.निलंबन आढावा समिती, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक मशा/पुनस्था/2021/प्र.क्र.२११९३,जा.क्र. १५२४५-१३,दिनांक ०७/०७/२०२१
८) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक निप्रआ/११११/प्र.क्र.८६/११ अ, दिनांक १४/१०/२०११

श्री रविकिरण भास्कर भोजणे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कापसे वस्ती, ता. जामखेड हे शालेय कामकाजाचे कर्तव्य कामी कार्यरत असताना त्यांनी केलेल्या गैरवर्तनामुळे दिनांक ०३/०१/२०१९ अन्वये त्यांना जिल्हा परिषद सेवेतील प्राथमिक शिक्षक या पदावरुन तात्पुरत्या रित्या दूर करणेत आले होते. श्री रविकिरण भास्कर भोजणे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कापसे वस्ती, ता. जामखेड यांचे पदावरुन तात्पुरत्या रित्या दूर केलेल्या कालावधीमध्ये मुख्यालय पंचायत समिती नगर येथे ठेवणेत आलेले होते.

श्री रविकिरण भास्कर भोजणे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कापसे वस्ती, ता. जामखेड यांनी केलेल्या गैरवर्तनाबाबत त्यांचे विरुध्द इकडील कार्यालयांने दिनांक २१/०५/२०१९ अन्वये दोषारोप बजाविणेत आलेले होते.

सहाय्यक आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे चौकशी अहवाला मधील दोषारोपातील पहिला आरोप व तिसरा आरोप सिध्द होत नाही. तसेच दुसरा आरोप न्यायप्रविष्ठ असल्याचा अभिप्राय सहायय्क आयुक्त,(चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांनी दिलेला आहे.

मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर जामखेड यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील रिट याचिका क्रमांक ७५३/२०१९ मधील दिनांक १९/०१/२०२१ रोजीचे निर्णयानुसार सदरचे प्रकरण निकाली काढलेले आहे.

मा.निलंबन आढावा समिती, नाशिक विभाग नाशिक यांनी त्यांचेकडील दिनांक २५/०६/२०२१ चे निलंबन आढावा समिती मध्ये शासन परिपत्रक क्रमांक निप्रआ/ १११२/ प्र.क्र.८२/११-अ, दिनांक २०.०४.२०१३ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करणेबाबत आदेशित केलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक १४/१०/२०११ चे शासन निर्णयानुसार न्यायालयात अभियोग दाखल झालेल्या निलंबित शासकीय कर्मचा-यास न्यायालयाने दोषमुक्त केले असेल तर निलंबित कर्मचा-यांस पुन:स्थापीत करणेची तरतुद आहे. सबब संदर्भ क्रमाकं ६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन. श्री रविकिरण भास्कर भोजणे, प्राथमिक शिक्षक, यांना दिनांक ०३/०१/२०१९ अन्वये पदावरुन तात्पुरत्या रित्या दूर केलेने त्यांना जिल्हा परिषद सेवेत सामावुन घेऊन, त्यांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा **शिरसाठवस्ती ता.कोपरगाव,** जिल्हा - अहमदनगर येथे प्राथमिक शिक्षक या पदावर नियमित पदस्थापना देऊन पुन:स्थापीत करणेत येत आहे.

सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यांत यावी. श्री रविकिरण भास्कर भोजणे, प्राथमिक शिक्षक, यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. तसेच सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवा पुस्तकांत घेणेत यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक २०२१०९०६७६००९२— असा आहे.

(राजेंद्र क्षीरसागर)
जिल्हा परिषद अहमदनगर
मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रती,

श्री रविकिरण भास्कर भोजणे, प्राथमिक शिक्षक

द्वारा व प्रत - गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड

2/- सदर आदेश श्री रविकिरण भास्कर भोजणे, प्राथमिक शिक्षक यांना बजाविणेत येऊन त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेऊन दुय्यम प्रत या कार्यालयांस सादर करणेत यावी.

प्रत - माहितीसाठी सविनय सादर

मा.विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग नाशिक

(जि.प.कर्मचारी निलंबन समिती )

प्रत - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती नगर/कोपरगाव

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर

(राजेंद्र क्षीरसागर)
~~जिल्हा परिषद अहमदनगर~~
मुख्य कार्यकारी अधिकारी